लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ३२ वा | मंगळवार, दि. २० ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग ▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# महाराष्ट्र का पेटवला जातोय?




भारतीय संघ राज्यांमध्ये सुरुवातीपासूनच महाराष्ट्र राज्य सर्वच क्षेत्रात प्रगतशील व शांतता सुव्यवस्था सुरक्षितता प्रिय राज्य मानले जाते. भारतीय संविधानाचा आधार असलेली शिव, फुले, सयाजी, शाहू, आंबेडकर, गाडगेबाबा, तुकडोजी, पंजाबराव, अण्णाभाऊ प्रबोधनकार ही विचारधारा इथेच जन्माला आली. पोसली. तसेच घरोघरी पोचली. समाजातील सर्व घटकांनी स्वीकारली. आत्मसात केली. परंतू दुर्दैवाने गेली काही वर्षे आर. एस. एस. व भाजप क्रुरपणे महाराष्ट्रातील सौख्य कायमस्वरूपी बिघडवण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी कार्यरत आहे. त्यासाठी किरकोळ कारणावरून महाराष्ट्रात धार्मिक जातीय दंगली घडवून आणल्या जात आहेत. यामागची ऐतिहासिक कारणमीमांसा करताना या बाबी स्पष्ट होतात. वाचकांनी विचार करून योग्य निर्णय घ्यावा ही विनंती आहे.

मुळातच महाराष्ट्रावर अठराव्या शतकात पेशवाईचे प्राबल्य निर्माण करण्यात तत्कालीन ब्राह्मणी शक्ती यशस्वी झाल्या होत्या. छत्रपती निष्क्रिय व नामधारी झाले होते. या परिस्थितीत भारतातील प्लासीच्या लढाईत इंग्रजांना यश मिळाले आणि व्यापारी इंग्रज बंगाल प्रांताचे राज्यकर्ते झाले. नंतर बक्सरच्या लढाईतील यशाने इंग्रजी सत्तेला बळ मिळाले. तर त्याचवेळी भारतीय ब्राह्मणी शक्तीने इंग्रजांना आपले भाऊ मानले. मोगलशाही हारली व इंग्रज सत्तेवर आले हा आनंद साजरा करण्यासाठी बंगाली साहित्यिक बकीमचंद्र चटोपाध्याय यांनी आनंदमठ कादंबरी लिहिली. त्यात वंदे मातरम् गित घातले. एकीकडे मराठेशाही खिळखिळी झाली व १८१८ जून मध्ये चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण चिंत्या नातूने शनिवारवाड्यावरील फडकणारा भगवा खाली उतरवून युनियन जॅक तेथे फडकवला. छत्रपती व पेशवे इंग्रजांचे गुलाम पाहूणे झाले. पुढे १९४७ पर्यंत ब्राह्मणांनी इंग्रजांच्या काळात नोकरशहा बनून सत्तेचा मलिदा खाल्ला. परंतू अनेक प्रकारचे प्रयत्न करुनही इंग्रजांनी ब्राह्मणांना राजसत्तेच्या पायरीवर देखील येऊ दिले नाही. तरीही इंग्रजी सत्ता रहावी असे मानणारा मोठा उच्च शिक्षित ब्राह्मण समाज होता. याच धामधुमीत ब्राह्मणांनी आर. एस. एस. ची स्थापना १९२५ मध्ये केली. त्या दिवसापासून त्यांना महाराष्ट्रावर एकसुत्री आर. एस. एस. ची रामदासी राजसत्ता प्रस्थापित करायची एकमेव तिव्र अभिलाषा आहे. इंग्रजांनी पेशव्यांकडून राज्य ताब्यात घेतले होते. ते इंग्रजांनी ब्राह्मणांनाच परत देणे व मनुस्मृती नुसार नव पेशवाईने राज्यकारभार करणे हीच ब्राह्मणी पाशवी इच्छा आहे. त्यामुळेच त्यांना भारतातील महाराष्ट्र वगळता अन्य सर्वच राज्ये व केंद्रशासित प्रदेशात एकहाती सत्ता व भारतात केंद्रीय सत्ता ताब्यात असली तरी समाधान नाही. एकच लक्ष्य, महाराष्ट्रात पेशवाई लादणे. आणि हे यश मिळत नाही तोपर्यंत या मावळ्यांच्या अवर्णनीय कर्तृत्वाने निर्माण झालेल्या स्वराज्याचे जमेल तसे लचके तोडून महाराष्ट्र राज्य कंगाल करणे हे ब्राह्मणी कारस्थान सुरू आहे.

महाराष्ट्रात आर. एस. एस. चे मुख्यालय आहे, जागतिक किर्तीचे ब्राह्मणवादी रामदासी विचारवंत आहेत, देशाच्या राष्ट्रपती पदावर ते प्रधानमंत्री, तिन्ही सेनाप्रमुख, सर्व



**पुरुषोत्तम खेडेकर, संस्थापक, मराठा सेवा संघ, महाराष्ट्र**

नोकरशाही, सर्व उद्योजक, बँकर्स, कुलपती कुलगुरू, सांस्कृतिक धार्मिक आध्यात्मिक शैक्षणिक संस्था आर. एस. एस. च्या ताब्यात आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळा बंद केल्या आहेत. प्रत्येकाच्या मनात व ह्रदयात आर. एस. एस. चे नाव व विचार पोचवले आहेत. तरीही महाराष्ट्रातील फाटका तुटका बहुजन समाज शिव, फुले, सयाजी, शाहू, आंबेडकर, गाडगेबाबा, तुकडोजी, पंजाबराव, अण्णाभाऊ प्रबोधनकार यांच्या विचारांचा वारसा सोडायला तयार नाही. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन दोन तुकडे केले, कॉंग्रेसच्या नेत्यांना भाजपवासी केले तरी लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला दारुण पराभव पाहावा लागला. खरे तर महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे चाळीस तर महायुतीचे आठ उमेदवार निवडून येणे अपेक्षित होते. परंतू भाजपला पोषक ठरणारा घोळ झाला. महाविकास आघाडीचे उमेदवार शंभर टक्के यशाची खात्री करून निवडले जातील. तिन्ही पक्षांचे एकमत झाले तरच उमेदवार नाव ठरवू. अशा चर्चा झाल्या. पण दुर्दैवाने तसे झाले नाही. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी बहुजनवादी पुरोगामी चळवळींचे कार्य व विचार भारतीय राज्यातील गावोगावी पोहचलेले आहेत. २००४ आणि २००९ मधील सार्वजनिक निवडणुकीत संभाजी ब्रिगेडची भंडारकर संस्था विरोधात केलेली कारवाई महाराष्ट्रात व देशात युपीए सरकार आणण्यासाठी उपयोगी ठरली होती. २०२४ मध्ये हीच पुनरावृत्ती झाली आहे. गेले अनेक वर्षे शेकडो पुरोगामी चळवळी रात्रंदिवस महाराष्ट्रातील समतावादी मानवतावादी संविधान आचरणातून प्रदर्शित करणारी जनता निर्माण करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. या व अन्य कारणांमुळे आर. एस. एस. चे प्रमुख नेते व कर्मठ ब्राह्मण अस्वस्थ झाले आहेत. सामाजिक चळवळीतील संभाजी ब्रिगेड (पान 2 वर..)

# लोकशाहीच्या आडून हुकूमशाही सुरु - अॅड. असीम सरोदे

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** संविधानातील आम्ही भारतीय लोक म्हणजे गणराज्य व संघराज्य आहे. त्यामुळेच संविधानातील कलम एकमध्ये इंडिया म्हणजे भारत सगळ्या राज्यांचे एक संघराज्य असेल, असे म्हटले आहे. येथील गण म्हणजे नागरिक आपले लोकप्रतिनिधी निवडून देतील व संघराज्य कारभार चालावा ही संविधानाची रचना मान्य नसलेले राजकीय नेते एककेंद्री सत्ता निर्माण करून लोकशाहीच्या आडून हुकूमशाही चालवित आहेत, असे परखड मत संविधान विश्लेषक अॅड. असीम सरोदे यांनी मांडले.

यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृह, बार्शी येथे संविधान जागृती अभियान आयोजित बार्शी संविधानातील आम्ही भारतीय लोक या विषयावर बोलताना अॅड. असीम सरोदे. 'संविधानातील आम्ही भारतीय लोक' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. काका गुंड होते. मनीष देशपांडे आणि कृतार्थ शेवगावकर यांनी निर्मिती केलेल्या भारतीय संविधान उद्देशिका तक्त्याचे प्रकाशन अॅड. सरोदे यांच्या हस्ते झाले.

अॅड. सरोदे पुढे म्हणाले, वृत्तपत्र माध्यमे, जाहिराती यांचा वापर खोटे चित्र निर्माण करण्यासाठी मायावी प्रयोग म्हणून होतो आहे. त्यामुळे स्वार्थी राजकारण्यांना कुणी नागरिक नकोत तर मतदार हवेत. असत्यच सत्य म्हणून विनधोकपणे वावरू



शकेल, महत्त्वाच्या पदांवर वसून जनतेचा पैसा उधळू शकेल, अशी सोय तयार करुन देणारे देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील राजकीय वातावरण नासवले. आज एकनाथ शिंदे यांचे संविधानिक नैतिकता उधळून टाकणारे सरकार राज्यात आहे, असा आरोप करून सरोदे म्हणाले, आता अत्यंत प्रामाणिक संविधानिक विचार करणारे नागरिक राज्यातील सत्ताबदल घडवून आणतील. लोकशाही हवी, लोकसहभाग हवा, पण आम्ही राजकीय विचार करणार नाही, असा विचार करणे नागरिकांनी सोडले पाहिजे, असा सल्ला अॅड. सरोदे यांनी दिला. अॅड. श्रीया आवळे म्हणाल्या, कौटुंबिक केसेस, घटस्फोट व फौजदारी केसेसमधून नवीन दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न प्रचलित न्यायव्यवस्थेत आम्ही करतो. कार्यक्रमासाठी सुमित खुरंगळे, आकाश दळवी, विवेक गजशिव, उमेश नेवाळे, मनीष देशपांडे, डॉ. अशोक कदम, डॉ. दिलीप कदम आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता देव यांनी केले.

# भाजप शिंदेसेना यांच्यात मोठा वाद
## विधानसभेच्या तोंडावर महायुती तुटणार
### फडणवीसांच्या नाराजीनंतरही 'भाई' ठाम; रामदास कदमांचा पुन्हा चव्हाणांवर घणाघात

**मुंबई (वृत्त सेवा):-** शिवसेना नेते रामदास कदम यांनी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्यावर मुंबई-गोवा महामार्गावरुन मोठा वाद झाला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नाराजीनंतरही रामदास कदम त्यांच्या वक्तव्यावर ठाम आहेत. रामदास कदम यांनी पुन्हा एकदा रवींद्र चव्हाण यांच्यावर निशाणा साधला आहे. 'याला राजकारण म्हणता येणार नाही, याला 14 वर्षांपासून मुंबई-गोवा महामागार्च काम चालू आहे. गेली 14 वर्ष कोकणवासीयांना वनवास बघावा लागतोय. प्रभू रामचंद्राचा वनवास संपला. तरी आजही आम्ही मुंबई-गोवा महामार्गावर प्रवास करू शकत नाही, अशी अवस्था आहे. मागच्या वर्षी रवींद्र चव्हाण यांनी आश्वासन दिलं होतं, पुढच्या वर्षी गणपतीमध्ये कोणतीही अडचण येणार नाही. डिसेंबर महिन्यात दोन्ही महामागार्चे रस्ते सिमेंटचे बनवले जातील. महामार्ग आजही पूर्ण होऊ शकला नाही, याचं दुःख आम्हाला आहे', असं रामदास कदम म्हणाले.



**रवींद्र चव्हाणांचाही पलटवार**

रविंद्र चव्हाण कुचकामी मंत्री आहेत, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चमकोगिरी करणाऱ्या मंत्र्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी रामदास कदम यांनी केली. तर रामदास कदमांच्या आरोपांवर रवींद्र चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिलंय. रस्ते खातं गडकरींकडे, कदमांना माहित नाही का? समोरासमोर या आणि बोला, मलाही अशा भाषेत बोलता येतं. युतीधर्म मी एकटा पाळणार नाही, असा पलटवार रवींद्र चव्हाण यांनी केला आहे.

**'रवींद्र चव्हाण कुचकामी'**

'काल मी ठाण्याला गेले होतो. अनेक कोकणवासीयांनी मला विचारलं की आम्ही प्रवास कसा करायचा? आमची सत्ता असूनही नाईलाज असल्यामुळे आम्हाला कोकणवासीयांना सांगावं लागतंय की हा मंत्री कुचकामी आहे. हा मंत्री बनायच्या लायक नाही, हा नालायक आहे. दुसऱ्या चांगल्या माणसाला जबाबदारी द्या मुंबई-गोवा महामार्गाचं', अशी टीका रामदास कदम यांनी पुन्हा एकदा केली आहे.

'समृद्धी महामार्ग तीन वर्षांमध्ये होऊ शकतो मग मुंबई-गोवा हायवे 14 वर्षात का होऊ शकत नाही? हा नालायक माणूस मुंबई-गोवा महामार्गाबद्दल विचारलं तर उत्तर देत असेल, हा मेंढक झालाय हा पागल झालाय, मला कल्पना आहे. मुंबई-गोवा हायवेचं काय करणार आहे, याचं उत्तर शासनाने द्यावं. मी मुख्यमंत्र्यांना पत्र देणार आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि अजित पवार तिघांनी पनवेल पासून गोव्यापर्यंत प्रवास करून दाखवावा. हेलिकॉप्टरने पाहणी करू नका,' असं रामदास कदम म्हणाले आहेत.

**फडणवीसांचीही नाराजी**

दरम्यान रामदास कदम यांच्या या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. 'रवींद्र चव्हाण यांच्यावर होणारे आरोप हे कोणत्या युतीधर्मात बसतात? रामदासभाईचं काही म्हणणं असेल तर त्यांनी आमच्याशी बोलल पाहिजे होतं. वारंवार टोकाची भूमिका घेणं योग्य नाही' असं म्हणत फडणवीसांनी त्यांची नाराजी बोलून दाखवली.

एकीकडे भाजपचे नेते व कार्यकर्ते अजितदादाच्या विरोधात आंदोलन करून जोरदार टीकाही करतात. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हि कात्रीत पकडतात. मग नेमका महायुतीधर्म पाळणार कोण असा प्रश्न भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अजित पवार गट) यासह महायुतीतील कार्यकर्त्यांना पडला आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांच्यात सतत होत असलेल्या वादामुळे विधानसभेच्या तोंडावर महायुती तुटणार? अशी कुजबुज राजकीय वतुर्ळात चालू आहे.

स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड
बहुउद्देशिय व संशोधन संस्था
संचलित
मोहोळ शहरातील पहिली आधुनिक अभ्यासिका
* वैशिष्ट्ये *
• वातानुकूलित सुसज्ज इमारत व प्रसन्न वातावरण
• मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था
• आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प
• प्रदुषणमुक्त वातावरण
• स्वतंत्र प्रसाधनगृह
• वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन
• शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
• दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
• प्रत्येक जागा आरक्षित
• मर्यादित प्रवेश क्षमता
• वाहन तळाची सोय
• दि. १६ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत
• लॅपटॉप व मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट
• अभ्यासिकेत नोंदणी करणाऱ्या प्रथम १० विद्यार्थ्यांना शुल्कात १०% सूट
• संपर्कासाठी पत्ता •
बी.एन. गुंड कॉम्प्लेक्स, सोलापूर रस्ता, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
अभ्यासिकेची वेळ : स. ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत
मो. नं. 7038864753 / 9226517873



